ePaper

झाकीर हुसेन, सुधा मूर्ती, रविना टंडन यांना पद्म पुरस्कार जाहीर

| वर्ष - 6 | अंक - 280 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

**महाईन्यूज**

**शुक्रवारी अंक नाही...**

**महाईन्यूज** या डिजिटल इपेपरच्या कार्यालयास गुरुवार दिनांक 26 जानेवारी रोजी भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त सुटी असल्याने शुक्रवार, दिनांक 27 जानेवारी 2023रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची आमचे वाचक, विक्रेते, जाहिरातदार, हितचिंतक यांनी नोंद घ्यावी. - संपादक

सुटीच्या दिवशीही **महाईन्यूज**शी कनेक्ट राहण्यासाठी खालील लिंकवर क्लिक करावे.

https://mahaenews.com/



७४ वा भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा

प्रजासत्ताक दिन चिरायू होवो

www.mahaenews.com | गुरुवार दि. 26जानेवारी 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# बिनविरोध नसेल, तर लढाईची तयारी!

## » जगताप घराण्यामध्ये दोन गट नाही : चंद्रकांत पाटील




**।पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**चिंचवड विधानसभा मतदार संघातील पोटनिवडणुकीतील उमेदवारीवरुन जगताप कुटुंबियांमध्ये दोन गट असल्याच्या अफवा गेल्या आठवडाभरामध्ये शहराच्या राजकारणात हेतुपुरस्सर पसरवण्यात आली. मात्र, जगताप कुटुंबियांमध्ये दुमत असण्याचे कारण नाही. निवडणूक पूर्वतयारी बैठकीला दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या पत्नी अश्विनी जगताप आणि चिंचवड विधानसभा निवडणूक प्रभारी शंकर जगताप यांनी उपस्थिती लावली.**

विशेष म्हणजे, राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी अश्विनी जगताप आणि शंकर जगताप यांच्यासोबत एकत्रित पत्रकार परिषद घेवून “जगताप कुटुंबात दोन गट” या अफवेच्या फुग्यातील हवा अलगद काढून घेतली.

यावेळी मावळचे खासदार श्रीरंग बारणे, शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे, विधान परिषदेच्या आमदार उमा खापरे, चिंचवड विधानसभा पोटनिवडणूक भाजपा संपर्क प्रमुख मुरलीधर मोहोळ, रिपाइंच्या माजी नगरसेविका चंद्रकांता सोनकांबळे उपस्थित होत्या.

चंद्रकांत पाटील म्हणाले की, निवडणूक झाली, तर कशी ते लढावी याविषयी चर्चा झाली. उमेदवारी कोण असावा हे आम्ही ठरवत नाही. कोअर कमिटी ठरवते. जगताप कुटुंबात दुमत असणे काही कारण नाही. बिनविरोध होण्यासाठी आम्ही विनंती करणार आहोत. आम्ही त्यासाठी कामाला लागणार आहोत. सर्वांना निवेदन देणार आहोत. कसबा आणि चिंचवड विधानसभा बिनविरोध होण्यासाठी प्रयत्न करणार आहोत.

दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप हे केवळ आमदार नव्हते. ते पिंपरी-चिंचवड शहराचे लोकनेते होते. त्यामुळे ही निवडणूक बिनविरोध व्हावी, अशी आमची अपेक्षा आहे. दहावी, बारावीच्या परीक्षांच्या निमित्ताने निवडणूक आयोगाने निवडणुकीच्या तारखांमध्ये बदल केला आहे. दि. २७ फेब्रुवारी ऐवजी दि. २६ फेब्रुवारीला करण्याचे निश्चित करण्यात आले. त्यामुळे भाजपाने गाफील न राहता तयारी करण्याची भूमिका कायम ठेवली आहे. शक्ती केंद्र आणि बूथ यंत्रणा सक्षम करण्यात आली आहे. त्याची जबाबदार संघटन सरचिटणीस अमोल थोरात यांच्याकडे आहे.

### उमेदवार जगताप कुटुंबातीलच...



» निवडणूक दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या मतदार संघाची असून, याठिकाणी जगताप कुटुंबियांमधूनच उमेदवार दिला जाईल, यात शंका नाही. मात्र, त्याबाबत भाजपाच्या पक्षशिस्तीप्रमाणे प्रदेश कोअर कमिटी निर्णय घेत असते. आम्ही संभाव्य उमेदवारांची नावे कोअर कमिटीकडे पाठवली आहेत, असेही पाटील म्हणाले.

### महेश लांडगेंच्या नेतृत्वाचा कस...



» भाजपाने पोटनिवडणुकीच्या तयारीसाठी आढावा बैठक घेतली. यामध्ये महत्वाच्या समितीप्रमुखांची जबादारी निश्चित करण्यात आली. कोपरासभा पासून निवडणूक प्रचार यंत्रणेचे नियोजन करण्याची जबाबदारी माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे यांच्याकडे आहे. मतदार संघात राज्य आणि केंद्रातील दिग्गज नेत्यांच्या सभा, त्याचे नियोजन काटे करणार आहेत. तसेच, सर्वपक्षीय प्रतिस्पर्धी उमेदवार आणि त्या-त्या पक्षांच्या नेत्यांना सदर निवडणूक बिनविरोध करण्याबाबत आवाहन करणे आणि अन्य पक्षाच्या स्थानिक नेत्यांशी समन्वय करुन भाजपासोबत घेण्यासाठी स्थापन केलेल्या समितीची मोठी जबाबदारी शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांच्यावर सोपवण्यात आली आहे. त्यामुळे या निवडणुकीत लांडगे यांच्या नेतृत्वाचा कस लागणार आहे.

# महिलांना मंत्रिमंडळात स्थान!

## निवडणुका बिनविरोध होण्यासाठी महाविकास आघाडीच्या नेत्यांना विनंती करणार : देवेंद्र फडणवीस

।पुणे। महाईन्यूज। प्रतिनिधी।

कसबा आणि चिंचवड या दोन्ही मतदारसंघांमध्ये पोटनिवडणुका होणार आहेत. शिवसेना, राष्ट्रवादी आणि काँग्रेस पक्ष बिनविरोध निवडणुकीऐवजी या मतदारसंघामध्ये उमेदवार देणार असल्याची चर्चा आहे. त्यावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. निवडणुका बिनविरोध होण्यासाठी महाविकास आघाडीच्या नेत्यांना विनंती करणार, मात्र विनंती मान्य करायची की नाही हे त्यांनी ठरवायचे आहे, असे फडणवीस म्हणाले.

महाविकास आघाडीने अनेकवेळा विनंती केली, आम्ही मान्य केली. आता त्यांनी काय करायचे हे त्यांनी ठरवायचे. पण, मला वाटते निवडणुका न होता बिनविरोध उमेदवारांना निवडून देणे हे सर्वांसाठी उचित राहील, असे फडणवीस म्हणाले.सत्यजीत तांबे नाशिक पदवीधर मतदारसंघासाठी अपक्ष उभे आहेत.सत्यजीत यांच्यावर काँग्रेस नाराज असून त्यांच्यावर टीका होत आहे. या पार्श्वभूमीवर फडणवीस यांना विचारले असता, सत्यजीत हे अपक्ष उभे आहेत, त्यांना काँग्रेसने निलंबित केले आहे. तिथली नेमकी परिस्थिती काय? हे माझ्या ऐवजी त्यांना विचारायला हवे, असे फडणवीस म्हणाले.



राज्य सरकारचे विस्तार होणार असल्याची चर्चा आहे. असे झाल्यास महिलांना मंत्रिमंडळात स्थान देणार का? या प्रश्नावर देवेंद्र फडणवीस यांनी होकारार्थी उत्तर देत शंभर टक्के मिळेल, अशी प्रतिक्रिया दिली.

### उमेदवारांना बिनविरोध निवडून द्यावे

» महाविकास आघाडीने अनेकवेळा विनंती केली, आम्ही मान्य केली. आता त्यांनी काय करायचे हे त्यांनी ठरवायचे. पण, मला वाटते निवडणुका न होता बिनविरोध उमेदवारांना निवडून देणे हे सर्वांसाठी उचित राहील, असे फडणवीस म्हणाले.सत्यजीत तांबे नाशिक पदवीधर मतदारसंघासाठी अपक्ष उभे आहेत. सत्यजीत यांच्यावर काँग्रेस नाराज असून त्यांच्यावर टीका होत आहे. या पार्श्वभूमीवर फडणवीस यांना विचारले असता, सत्यजीत हे अपक्ष उभे आहेत, त्यांना काँग्रेसने निलंबित केले आहे. तिथली नेमकी परिस्थिती काय? हे माझ्या ऐवजी त्यांना विचारायला हवे, असे फडणवीस म्हणाले.



# सुवर्णपाळण्यात मंगल स्वरांच्या नादघोषात दगडूशेठ मंदिरात गणेशजन्म सोहळा

।नारायणगाव । महाईन्यूज ।प्रतिनिधी।

श्रीगणेशा पाळणा हलके हलके जोजवा... पाळण्याचा मधोमध याला ग निजवा... अशा मंगल स्वरांत पाळणा म्हणत पारंपरिक वेशातील महिलांनी गणरायाची मनोभावे प्रार्थना केली. स्वस्तिक, ओम यांसारखी शुभचिन्हे आणि गजमुखाच्या नक्षींनी सजलेल्या सुवर्णपाळण्यात यंदा श्रीमंत दगडूशेठ गणपती मंदिरात श्री गणेश जन्म सोहळा दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास हजारो गणेशभक्तांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न झाला.श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट आणि सुवर्णयुग तरुण मंडळच्यावतीने गणेश जन्म सोहळा बुधवार पेठेतील दगडूशेठ गणपती मंदिरात आयोजित करण्यात आला होता. सोहळ्याला डॉ. कृतार्थ क्षीरसागर, डॉ. रिद्धी क्षीरसागर, केदार गोडसे, प्राजक्ता गोडसे यांच्या हस्ते गणेशजन्माचे पूजन झाले. मंदिरावर केलेली तिरंगी फुलांची आरास व विद्युतरोषणाई अशा मनोहारी सजावटीने मंदिर परिसर अधिकच खुलला.

शेकडो गणेशभक्तांनी बाप्पाचे दर्शन घेत सुख-समृध्दी नांदू दे अशी प्रार्थना सर्वांनी श्रीं चरणी केली. यावेळी शारदा गोडसे, मृणालिनी रासने, ज्योती सूर्यवंशी, तृप्ती चव्हाण, संगीता रासने, ट्रस्टचे महेश सूर्यवंशी, अक्षय गोडसे, अमोल केदारी, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण, यांसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. अर्चना भालेराव, डॉ. अनघा राजवाडे, प्रेरणा देशपांडे, चित्रा जोशी, रत्ना नामजोशी, मानसी गिजरे यांसह इतर महिलांनी जन्माचा पाळणा, गणेश गीत व गणपतीचा गजर केला. जन्माच्या वेळी पुष्पवृष्टी देखील करण्यात आली. भक्तांनी दिलेल्या देणगीतून सुवर्णपाळणा साकारण्यात आला.

# पुण्यात जातपंचायतीच्या निर्णयामुळे कुटुंब २३ वर्षांपासून बहिष्कृत

## जातीत परत घेण्यासाठी सव्वा लाखांचा दंड; पंचाच्या विरोधात गुन्हा दाखल

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

पुरोगामी विचारांचा वारसा असलेल्या पुण्यात आंतरजातीय विवाह केल्याने एका कुटुंबाला समाजातून २३ वर्षांपूर्वी जातीपंचायतीने बहिष्कृत केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. समाजात परत घेण्यासाठी सव्वा लाख रुपये दंड मागितल्याप्रकरणी श्री गौड ब्राह्मण समाजाच्या जात पंचायतीतील पंचांसह आठ जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याबाबत प्रकाश नेमीचंद डांगी (वय ४६, रा. हरपळे गल्ली, फुरसुंगी, हडपसर) यांनी बिबवेवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या प्रकरणी ताराचंद काळूराम ओझा (रा. गंज पेठ), भरत नेमीचंद मेवाणी (रा. अरण्येश्वर), मोतीला भोमाराम शर्मा डांगी (रा. खिवाडा, जि. पाली, राजस्थान), प्रकाश लालूराम बोलद्रा उर्फ शर्मा (रा. पद्मावती), संतोष उणेचा (रा. भवानी पेठ), बाळू शंकरलाल डांगी (रा. पाषाण), भवरलाल डांगी (रा. मारवाड जंक्शन, राजस्थान), हेमाराम ओझा (रा. सिनला, जोधपूर, राजस्थान) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी प्रकाश डांगी श्री गौड ब्राह्मण समाजातील असून ते रिक्षाचालक आहेत. १९९८ मध्ये त्यांनी आंतरजातीय विवाह केला होता. त्यामुळे त्यांना समाजातून बहिष्कृत करण्यात आले होते. समाजाकडून बांधण्यात येणाऱ्या मंदिराचा प्राणप्रतिष्ठापना सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या बैठकीसाठी ते गेले होते. बिबवेवाडीतील एका मंदिरात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी पंचांनी डांगी यांना मंदिरातील बैठकीत कसा आला, तुला समाजातून बहिष्कृत करण्यात आले आहे. तू निघून जा, असे सांगितले.



निमंत्रण पत्रिकेत त्यांचे नाव नव्हते. समाजाच्या विविध कार्यक्रमांचे निमंत्रण डांगी यांना देण्यात आले नव्हते. पद्मावतीतील एका सभागृहात नुकतेच स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्याचे निमंत्रण डांगी यांना देण्यात आले नव्हते. समाजातील प्रत्येक कार्यक्रमांपासून डांगी यांना जाणीवपूर्वक दूर ठेवण्यात आले होते. डांगी यांनी समाजात परत घ्या, असे पंचांना सांगितले. समाजाचे अध्यक्ष मोतीला शर्मा, भरत मावाणी यांच्याकडे अर्ज केला होता. समाजात पुन्हा यायचे असेल तर एक लाख २५ हजार रुपये दंड मागण्यात आला. अखेर डांगी यांनी पोलिसांकडे तक्रार दिली. त्यानुसार २०१६ च्या सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक कायदा कलम ६ आणि ७ नुसार तसेच भारतीय दंडसंहिता कलम ३४ नुसार पंचांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# 20 हजार महिलांना रोजगार!

## » इंद्रायणी थडीला सुरुवात : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विश्वास




।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या "स्टार्ट अप इंडिया" या यशस्वी योजनेत महिलांचा वाटा ५० टक्के आहे. त्यामुळे ही योजना यशस्वी झाली. तसेच, "इंद्रायणी थडी" च्या माध्यमातून १ हजार महिला बचतगटांच्या माध्यमातून सुमारे २० हजार महिलांच्या हाताला रोजगार मिळाला, ही बाब कौतुकास्पद आहे, अशा भावना राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली. आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून आणि शिवांजली सखी मंचच्या पुढाकाराने भोसरीतील गावजत्रा मैदानावर "इंद्रायणी थडी- २०२३" महोत्सवाचा शुभारंभ फडणवीस यांच्याहस्ते बुधवारी सायंकाळी झाला. दीप प्रज्वलन करुन महोत्सवाची सुरूवात करण्यात आली.**



यावेळी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, प्रखर हिंदूत्वाचा पुरस्कर्ते कालिचरण महाराज, समरसता गुरूकुलमचे पद्मश्री गिरीश प्रभुणे, माजी मंत्री बाळा भेगडे, आमदार राहुल कुल, उमा खापरे, जगदीश मुळीक, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, माजी खासदार अमर साबळे, माजी आमदार शरद सोनवणे, बापुसाहेब पठारे, चिंचवड विधानसभा निवडणूक प्रभारी शंकर जगताप, कांचन कुल, शिवांजली सखी मंचच्या अध्यक्षा पुजा लांडगे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, भाजपा सर्व पदाधिकारी उपस्थित होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा प्रभू श्रीराम यांचे मूर्ती देवून माजी महापौर माई ढोरे, नितीन काळजे, राहुल जाधव यांच्याहस्ते सन्मान करण्यात आला. तसेच, माजी समिती सभापती विलास मडीगेरी, सतोष लोंढे यांच्याहस्ते चंद्रकांत पाटील यांचा सन्मान करण्यात आला. तसेच, दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप, मुक्ता टिळक, दिगंबर भेगडे आणि बाबुराव पाचर्णे यांच्या कुटुंबियांनाही प्रभू श्रीराम मूर्ती भेट देण्यात आली. माजी नगरसेविका नम्रता लोंढे यांनी प्रास्ताविक केले. कालिचरण महाराज यांचे शिवतांडव स्त्रोत पठन करण्यात आले. आभार पुणे जिल्हा नियोजन समितीचे सदस्य विजय फुगे यांनी मानले.

## महेश लांडगे संवेदनशील मनाचा आमदार : उपमुख्यमंत्री

» देवेंद्र फडणवीस म्हणाले की, भाजपा सत्ताकाळात राज्यातील महिला बचतगट सक्षमीकरण चळवळीच्या माध्यमातून ३ लाखहून ५७ लाख महिलांना जोडण्यात आले. महिलांना १ लाखपर्यंतचे लोन बिनव्याजी देण्याचा निर्णय घेतला. महिला बचतगटांची कर्जवसुली १०० टक्के होते. मातृशक्ती या मानव संसाधनाचा समावेश विकास प्रक्रियेत केल्यास प्रगती निश्चित आहे. अर्थव्यवस्था आणि सामाजिक प्रवाहात महिलांना सहभागी करुन घेतले पाहिजे. बचतगटाच्या माध्यमातून महिलांना उद्योगांशी जोडले पाहिजे. तसेच, पिंपरी-चिंचवडच्या मातीला आजही ग्रामीण संस्कृतीचा सुंगध आहे. त्यामुळे ग्राम संस्कृती आणि सुमारे ८०० वर्षांचा लढा यशस्वी झाल्यानंतर अयोध्येत साकारणारे प्रभू श्रीराम मंदिराची भव्य प्रतिकृती, भारतीय जनता पार्टीला वाढवण्यासाठी निष्ठा जपणारे दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप, मुक्ता टिळक, दिगंबर भेगडे, बाबुराव पाचर्णे यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी त्यांची अर्धाकृती शिल्पे उभारण्यात आली आहे. तसेच, आपल्या मातोश्री कै. हिराबाई किसनराव लांडगे यांच्या स्मृती प्रित्यर्थ इंद्रायणी थडी मातृत्वाला समर्पित केली. त्यांचेही अर्धाकृती शिल्प उभारून जगभारातील मातांप्रति आदर व्यक्त केला. भव्य-दिव्य संकल्पना आणि उपक्रम राबवणारे महेश लांडगे संवेदनशील मनाचे आमदार आहेत, हे यातून दिसून येते, असेही फडणवीस म्हणाले.

## भव्य-दिव्य उपक्रम हिच महेश लांडगेंची ओळख : पालकमंत्री



» चंद्रकांत पाटील म्हणाले की, महेश लांडगे यांचा प्रत्येक उपक्रम भव्य-दिव्य असतो. बैलगाडा शर्यत, पक्षनिष्ठा पुतळे, प्रभू श्रीराम मंदिर प्रतिकृती, ग्रामीण संस्कृती, रिव्हर सायक्लोथॉन असे रेकॉर्ड ब्रेक उपक्रम राबवले जात आहेत. प्रत्येक बाबींचा बारकाईने विचार केलेला पहायला मिळतो. ज्यांनी भारतीय जनता पार्टी पक्ष उभा केला. त्यांचे पुतळे या महोत्सवात लावण्यात आले आहेत, ही सर्वात महत्वाची बाब आहे. पाच हजाराहून अधिक वर्षांपासून हिंदू समाज ज्यांचे नाव घेवून पुढे आला त्या प्रभू श्रीरामांच्या मंदिराची प्रतिकृती उभारली आहे. महिला बचतगटांकडून तयार केलेल्या वस्तुंना मार्केट मिळाले पाहिजे, तर प्रोत्साहन मिळेल, हा हेतू स्वागतार्ह आहे.

## बचतगटांची उत्पादनासाठीच व्यासपीठ : आमदार लांडगे



» आमदार महेश लांडगे म्हणाले की, जत्रेत येणाऱ्या नागरिकांनी बचतगटांची उत्पादने खरेदी करावीत. मॉलमध्ये खरेदी न करता बचत गटांकडून नागरिकांनी उत्पादनाची खरेदी करावी. यासाठीच हे व्यासपीठ उपलब्ध केले आहे. यापुढील काळातही हा महोत्सव भव्य स्वरुपात राखवला जाणार आहे. महिला बचत गटांना प्रोत्साहन देण्यासाठी या महोत्सवात अमृता फडणवीस यांना भेट देण्याबाबत विनंतीही आमदार लांडगे यांनी केली. यावेळी भारतातील सर्वात मोठ्या बैलगाडा शर्यतीला फडणवीस यांनी भेट दिली होती. त्यावेळी लांडगे यांनी शिवून दिलेल्या ड्रेसच्या आठवणी बोलून दाखवल्या. तसेच, यापुढील काळत भाजपाकडून देण्यात येणारी प्रत्येक जबाबदारी विश्वासाने पार पाडणार आहे, अशा विश्वासही लांडगे यांनी व्यक्त केला.

## संपादकीय »

# शीर्षासनी शिक्षण!

***शिक्षणाचा पाया असलेल्या प्राथमिक शिक्षणाकडे ढुंकूनही पाहायचे नाही आणि पदवी-पदव्युत्तर शिक्षणासाठी घोषणा करायच्या, असे झाल्यास विद्यार्थ्यांचा पाया कच्चाच राहणार..***

'प्रथम'चे भारतीय प्राथमिक शिक्षणव्यवस्थेचा आढावा घेणारे 'ॲन्युअल स्टेट्स ऑफ एज्युकेशन रिपोर्ट' ऊर्फ 'असर' वार्षिक अहवाल नवीन नाहीत. २००५ पासून हे सर्वेक्षणोत्तर अहवाल प्रसृत होत आहेत आणि ते आपल्या शिक्षणाची दशा दाखवून देत आहेत. यंदाचा अहवाल ही दशा किती लांब-रुंद आणि खोल आहे ते दाखवून देतो. 'असर'च्या यापूर्वीच्या अहवालांमधूनही हे सत्य अधोरेखित झालेले होते. मात्र त्याकडे कोणीही लक्ष दिले नाही. त्यामुळे वाचन आणि गणितामधील मूलभूत कौशल्ये यापूर्वीपेक्षाही कमी झाल्याचे निरीक्षण ताजा अहवाल नोंदवतो. म्हणजे परिस्थितीत सुधारणा होण्याऐवजी एकंदर आपली शैक्षणिक घसरगुंडी अबाधित असल्याने या अहवालाची दखल घेणे आवश्यक ठरते. उदाहरणार्थ आपले विद्यार्थी देशपातळीवर २०१२ मध्ये असलेल्या वाचनक्षमतेवरच अडकलेले आहेत. याचा अर्थ मधल्या काही वर्षांत ज्या काही सुधारणा झाल्या त्या टिकल्या तर नाहीतच; मात्र त्यांचा प्रवास उलट गतीने सुरू झाला. ही अवस्था देशातील बहुतेक राज्यांत दिसून येणे हे अधिक विदारक. यापूर्वी म्हणजे २०१८ मध्ये झालेल्या सर्वेक्षणात तिसरीतल्या मुलांना दुसरीचा धडा वाचता येण्याचे प्रमाण २७.३ टक्के होते, ते २०२२ मध्ये २०.५ पर्यंत घसरले आहे. म्हणजे इयत्ता तिसरीतील शंभरापैकी जेमतेम २० मुले दुसरीचा धडा वाचू शकतात. महाराष्ट्रातील स्थिती अधिकच काळजी करण्यासारखी दिसून येते. कारण अशा धडा वाचता येणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण आपल्या राज्यात ४२ टक्क्यांवरून थेट २६.६ टक्क्यांपर्यंत घसरले आहे. गणिताची अवस्था याहून बिकट. महाराष्ट्रात तिसऱ्या इयत्तेतील किमान वजाबाकी करू शकणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण २०१८ मध्ये २७.२ टक्के होते. ते अवघ्या चार वर्षांत १८.७ झाले आहे. याच्या बरोबरीने एकाच वर्गखोलीत अधिक इयत्तेतील विद्यार्थी बसवण्याचे राज्यातील शाळांचे प्रमाण वाढले आहे, असे असरच्या अहवालात नोंदवण्यात आले आहे. शाळांमध्ये २०१८ मध्ये दुसरीच्या वर्गात ४९.८ टक्के इतर इयत्तांतील मुले बसत असत. हे प्रमाण २०२२ मध्ये ५४.३ टक्के झाले आहे. अर्थात केवळ इमारती असणे, पाण्याची सुविधा असणे, वाचनालय उपलब्ध असणे म्हणजे शिक्षण नव्हे. पण देशात मुलींसाठी वापरण्यायोग्य शौचालये असलेल्या शाळांचे प्रमाण अद्यापही ६८.४ टक्के (महाराष्ट्रात ६०.८ टक्के) इतकेच आहे.

# दुसऱ्या हरित क्रांतीच्या दारात




भारत हा फळे व भाजीपाला उत्पादनात, पोल्ट्री क्षेत्रात आघाडीचा देश असूनही शेतकरी आत्महत्या करतात हा विरोधाभास आहे. आज भारत अन्नधान्य निर्मितीत नुसताच स्वावलंबी नाही, तर तो निर्यातही करतो. केंद्र सरकारचा निर्णय हा योग्य प्रकारे राबविणे ही सर्व भागदारकांची सामुदायिक जबाबदारी आहे. टी बोर्ड, कॉफी बोर्ड, कॉयर बोर्ड, रबर बोर्ड, स्पाईस बोर्ड, अपेडा या संस्था त्या त्या पदार्थांची उत्पादनवृद्धी तसेच निर्यातीसाठी प्रयत्नशील आहेत व त्याचा लाभधारकांना फायदा झाला. आज देशात ८२ टक्के शेतकरी हे अतिलहान किंवा लहान शेतकरी आहेत. त्यांच्याकडे अडीच एकरांहून कमी शेती आहे. हे सारे एकत्र येऊन जर सहकारी तत्त्वावर शेती करतील तर त्यांच्या उत्पन्नात वाढ होईल. पण त्यासाठी एकमत हवे.

१९९१ मध्ये शेतीचे व्यावसायिकीकरण हा प्रकल्प भारतात राबवविण्याचे ठरले. सर्वप्रथम हा प्रकल्प प्रायोगिक तत्त्वावर महाराष्ट्रात मराठा चेंबर व आयसीआयसीय बँकेच्या सहकार्याने करण्याचे ठरले. त्यासाठी केमोनिक्स कन्सल्टिंग या अमेरिकी सल्लागार संस्थेची निवड झाली. त्या संस्थेने मराठा चेंबर तसेच किर्लोस्कर कन्सल्टंट्स या पुण्यातील संस्थेशी करार केला. येथील अनुभवावरून तो आंध्र व इतरत्र राबविला जाणार होता. यात विविध फळे, फुले, भाजीपाला, सुकामेवा तसेच सेंद्रिय फळे व पालेभाज्या याबाबत बी बियाणे, आधुनिक यंत्रसामग्री प्रशिक्षण, तंत्रज्ञान, शीतगृह, वर्गीकरण, पॅकेजिंग, मालवाहतूक, मार्केटिंग, निर्यातसल्ला, यासाठी माफक दरात कर्जे मिळणार होती. परंतु या प्रकल्पाला विरोध झाला. शेवटी रद्द झाला. तो झाला असता तर लहान शेतकरी आज प्रगत दिसले असते.

शेतीबाबत नेहेमी स्वामीनाथन आयोगाचा संदर्भ दिला जातो. शेती व्यावसायिक व सहकारी पद्धतीने करावी अशी त्यांची एक शिफारस होती. पायाभूत सुविधा, सिंचन, शेतजमीन विकास, जलधारणा, रस्ते, संशोधन आणि विकास यात जनतेची गुंतवणूक वाढवण्यास प्राधान्य द्यावे. पिकांचा तसेच शेतकरी कुटुंबाचा आरोग्यविमा, बिगर शेतीस बंदी, भाव हमी, शेती उत्पादन व वितरण यावर नियंत्रण, याही शिफारसी त्यात होत्या. पण साखर लॉबीच्या दबावामुळे याही मागे पडल्या.



शेतकरी व सरकार यांचा संवाद खंडित झाल्याने सर्वोच्च न्यायालयाने १२ जानेवारी २०२१ रोजी एक समिती नेमली. यातील तीन कायद्यांना पंजाब व हरयाणात सर्वांत जास्त विरोध झाला. शेवटी केंद्र सरकारने ते कायदे मागे घेतले. खरे तर त्यात आक्षेपार्ह असे काही नव्हते. कायदे जारी करण्याआधी चर्चा केली असती तर गोंधळ टळला असता. ते कायदे हे लहान शेतकऱ्यांच्या फायद्याचे होते. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने चार सदस्य असलेली समिती नेमली होती. तिलाही ते कृषिहिताचे वाटले.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबलेल्या नाहीत. दुसरकडे, श्रीमंत शेतकऱ्यांनी महावितरणची कृषी वीजबिलांची १२ हजार कोटी रुपयांची थकबाकी सवलत देऊनही अजूनही भरलेली नाही. अनेक शेतकऱ्यांची कर्जमाफी झाली आहे. त्याशिवाय, अनेक योजना राबविल्या जात आहेत. एवढे असूनही अजून प्रश्न का सुटत नाहीत याचा विचार शेतकरी व सरकार या दोघांनी करायला हवा.

भारतात ८५ टक्के शेतकरी हे लहान आहेत. त्यांच्याकडे दोन हेक्टर किंवा त्यापेक्षा कमी जमीन आहे. शेतीच्या लहान आकाराने तिचे आधुनिकीकरण शक्य होत नाही. परिणामी शेती उत्पन्नावर मर्यादा येतात. या सर्व पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने तीन स्वतंत्र सहकारी संस्था स्थापल्या आहेत. हा निर्णय योग्य आहे. त्याला अकारण विरोध होऊ नये. यात राजकारण आणण्याचा प्रयत्न होईल. त्यापासून सावध राहणे महत्वाचे आहे. याबाबत सरकारशी संबंधित शेतकरी संघटना तसेच अन्य भागीदार यांनी एकत्र येऊन हे शेतकऱ्यांच्या फायद्याचे कसे होईल, हे बघणे गरजेचे आहे. या अंतर्गत नॅशनल एक्स्पोर्ट सोसायटी , नॅशनल सोसायटी फॉर ऑरगॅनिक प्रॉडक्ट्स आणि नॅशनल लेव्हल मल्टिस्टेट सीड को ऑपरेटिव्ह सोसायटी अशा तीन स्वतंत्र सहकारी संस्था स्थापन होतील. या माध्यमातून रोजगार, देशांतर्गत तसेच निर्यात बाजारपेठांची वाढ, ग्रामविकास, शेती उत्पन्न, बी बियाणे, खाते तसेच शेतीविषयक आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध होईल.

# यंदाचा अर्थसंकल्प सुखाची आशा लावणारा...

**सरकारचे खर्च महसुली आणि भांडवली अशा दोन प्रकारचे असतात. महसुली किंवा चालू खर्चात पगार, घेतलेल्या कर्जावरील व्याज, सबसिडी असे काही खर्च असतात. त्यातून कोणतीही मत्ता (ॲसेट ) निर्माण होत नाही.**

भांडवली खर्चातून मत्ता निर्माण होते. वाहतूक-प्रकल्प अथवा रस्तेबांधणी तसेच सिंचन, ऊर्जा, शिक्षण, आरोग्य यांसारख्या पायाभूत सुविधांची निर्मिती आणि सरकारी पायाभूत उद्योगांची निर्मिती या खर्चातून होते. दीर्घकालीन गुंतवणूक होते, रोजगार निर्माण होतो. म्हणून अर्थतज्ज्ञांची अशी अपेक्षा असते की महसुली/ चालू खर्च कमी असावेत, त्याचबरोबर भांडवली खर्च वाढावेत. चालू वर्षीच्या (२०२२-२३ च्या) अर्थसंकल्पानुसार ३१ मार्च २०२३ पर्यंत केंद्र सरकारचे एकूण अपेक्षित खर्च ३९ लाख ४४ हजार कोटी रुपये इतके आहेत, पण त्यापैकी केवळ ७ लाख ५० हजार कोटी रुपये भांडवली खर्चासाठी, त्यातही १ लाख ४० हजार कोटी रुपये जुनी कर्जे फेडण्यासाठी तर ३१ लाख ९४ हजार कोटी रुपये महसुली म्हणजे सरकार चालविण्यासाठी अपेक्षित होते. एप्रिल ते नोव्हेंबर २०२३ या काळात एकूण भांडवली खर्चापैकी ४ लाख ४७ हजार कोटी रुपये खर्च झालेले आहेत. महसुली खर्चामध्ये कर्जांवरील



व्याजापायी ९ लाख ४० हजार कोटी रुपये तर सबसिडीवर ३ लाख ५५ हजार कोटी रुपये खर्च होतील, असा अंदाज होता. एप्रिल ते ऑक्टोबर २०२२ या काळात अन्नधान्य, खते आणि पेट्रोलियम यांच्या सबसिडीवर २ लाख ३८ हजार कोटी रुपये खर्च झाले आहेत. पेन्शनवर २ लाख ७ हजार कोटी रुपये खर्च होणार आहेत. मात्र आता जुनी पेन्शन योजना बंद झाल्याने हा खर्च यापुढे वाढणार नाही.

येत्या वर्षीचा (२०२३-२४) अर्थसंकल्प हा आर्थिक वृद्धीला चालना देणारा असावा, ही प्रमुख अपेक्षा आहे. त्यासाठी सरकारची गुंतवणूक वाढणे अपेक्षित आहे. रेल्वे, रस्ते, हवाई सेवा, जल वाहतूक, अपारंपरिक ऊर्जा निर्मिती, दूरसंचार, आरोग्य, इलेक्ट्रॉनिक चिप निर्मिती, अणुऊर्जा, गृह निर्माण या क्षेत्रांमध्ये सरकारी गुंतवणूक वाढवली जाणे त्यामुळे आवश्यक ठरते. त्याचबरोबर मोबाइल निर्मिती, लघु व मध्यम उद्योग, विजेरी वाहने (ई-व्हेइकल), सौर ऊर्जा, शिक्षण या क्षेत्रांत खासगी गुंतवणूक वाढीला प्रोत्साहन देणाऱ्या योजना व्हाव्यात, तसेच मेक इन इंडिया, करोनाकाळातील 'उत्पादकता निगडित प्रोत्साहन योजना' चालू राहातील असे वाटते. खर्चांवर निर्बंध आणणे कठीण आहे. उदाहरणार्थ, करोनाकाळात सुरू केलेली 'प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना' (ज्याद्वारे गरिबांना मोफत अन्नधान्य पुरवले जात होते) ती डिसेंबर २०२२ पासून बंद करण्याचा निर्णय झाला खरा, पण त्याचबरोबर राष्ट्रीय अन्न सुरक्षा कायद्यानुसार पुरविले जाणारे अन्नधान्य दारिद्र्यरेषोखालील कुटुंबांना डिसेंबर २०२३ पर्यंत मोफत पुरविले जाईल, असे जाहीर करण्यात आले.

## ।। अभंगवाणी ।।



अगा करुणाकरा करितसें धांवा ।
या मज सोडवा लवकरी ॥१॥
ऐकोनियां माझी करुणेचीं वचनें ।
व्हावें नारायणें उतावीळ ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## सत्यजित तांबे यांना पाठिंबा देत काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षांचा राजीनामा

। नगर । महाईन्यूज ।

विधान परिषदेच्या नाशिक पदवीधर मतदारसंघातील काँग्रेसचे बंडखोर उमेदवार तथा अपक्ष उमेदवार सत्यजित तांबे यांच्यावरच पक्षाने अन्याय केल्याची भूमिका घेत त्यांचा निषेध करण्यासाठी काँग्रेसचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष बाळासाहेब साळुंखे यांनी पदाचा राजीनामा दिला आहे. साळुंखे हे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचे कट्टर समर्थक मानले जातात.

बाळासाहेब साळुंखे यांनी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्याकडे राजीनामा पाठविला आहे. आपण गेली तीन वर्षे जिल्हाध्यक्ष (ग्रामीण) म्हणून काम पाहत होतो. विधान परिषदेच्या नाशिक पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत सत्यजित तांबे यांच्यावर पक्षाने अन्याय केला. या अन्यायाचा निषेध म्हणून मी पदाचा राजीनामा देत आहे. तो मंजूर करावा, असे राजीनामा पत्रात साळुंखे यांनी म्हटले आहे.सत्यजित तांबे यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर लगेचच जिल्हाध्यक्ष साळुंखे यांनी त्यांना पाठिंबा जाहीर केला होता. उमेदवार सत्यजित तांबे व त्यांचे वडील मावळते आमदार डॉ. सुधीर तांबे या दोघांवरही पक्षाने निलंबनाची कारवाई केली आहे.

साळुंखे यांनी सत्यजित तांबे



# डाव्होसमध्ये 40 कोटींची उधळपट्टी!

## » मुख्यमंत्र्यांनी दौऱ्याचा तपशील जाहीर करावा

। मुंबई । महाईन्यूज ।

**राज्यात गुंतवणूक आणण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेल्या २८ तासांच्या डाव्होस दौऱ्यात तब्बल ३५ ते ४० कोटींचा खर्च झाला असून या दौऱ्यात मुख्यमंत्र्यांनी नेमके काय केले, याचा तपशील जाहीर करण्याची मागणी शिवसेना नेते माजी मंत्री आदित्य ठाकरे यांनी मंगळवारी केली. शिवसेना भवन येथील पत्रकार परिषदेत आदित्य ठाकरे यांनी डाव्होस दौऱ्यावरून पुन्हा एकदा मुख्यमंत्र्यांना लक्ष्य केले.**

चार दिवसांच्या डाव्होस दौऱ्यात साधारणतः ३५ ते ४० कोटी रुपये अंदाजित खर्च झाला. म्हणजेच दिवसाला साडेसात ते दहा कोटी खर्च झाला. यामध्ये आणखी नवीन खर्च वाढू शकतो, या दौऱ्यात त्यांच्यासोबत अधिकृत कोण होते, मित्रपरिवार सोबत गेला होता का, ते कुठे राहिले, त्यांचा खर्च कोणी केला, त्यांच्या गाड्यांचा खर्च कोणी केला, हे सगळे लोकांसमोर यायला हवे अशी मागणी ठाकरे यांनी केली. डाव्होसला जाण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी चार्टर्ड विमानाचा वापर केला. यावर दोन ते अडीच कोटी खर्च झाला असेल. कमर्शिअल विमानाऐवजी चार्टर्ड विमानाचा वापर लवकर पोहोचण्यासाठी करता. पण एकनाथ शिंदे उशिरा पोहोचले. यामुळे सकाळी साडेसात वाजता होणारे उद्घाटन सायंकाळी साडेसातला झाले व गुंतवणुकीसाठीच्या अनेक बैठका रद्द झाल्या, असा दावाही ठाकरे यांनी केला. बैठकांचे फोटो किंवा पुरावे कुठेही दिसले नाहीत. डाव्होसमध्ये एकूण झालेल्या करारांपैकी ३५ ते ४० कोटींचे जे करार झाले त्या तीन कंपन्या तर महाराष्ट्रातीलच होत्या असा दावा त्यांनी केला.




### 35 ते 40 कोटी रुपये

**» चार दिवसांच्या डाव्होस दौऱ्यात साधारणतः ३५ ते ४० कोटी रुपये अंदाजित खर्च झाला. म्हणजेच दिवसाला साडेसात ते दहा कोटी खर्च झाला. यामध्ये आणखी नवीन खर्च वाढू शकतो, या दौऱ्यात त्यांच्यासोबत अधिकृत कोण होते, मित्रपरिवार सोबत गेला होता का, ते कुठे राहिले, त्यांचा खर्च कोणी केला, त्यांच्या गाड्यांचा खर्च कोणी केला, हे सगळे लोकांसमोर यायला हवे अशी मागणी ठाकरे यांनी केली.**

# गोद्रीत महाकुंभला प्रारंभ, तीन हजार तांड्यांवर बंजारा समाजाचे धर्मांतर!

## » भाजपचे नेते आणि केंद्रीय मंत्री अमित शहांसोबत बैठक

।जळगाव। महाईन्यूज ।

**आठ राज्यांतील ११ हजार तांड्यांवर प्रत्यक्ष संपर्क करून तीन हजार तांड्यांवर बंजारा बांधवांचे धर्मांतर झाले आहे. सर्व बांधवांना पुन्हा सनातन हिंदू धर्मात परत आणणार आहोत. हिंदू गोर बंजारा व लबाना नायकडा समाज जागृत करण्यासाठी व समाजाला दिशा देण्यासाठी कुंभ आयोजित करण्यात आला आहे, असे संत बाबूसिंगजी महाराज यांनी सांगितले.**

जामनेर तालुक्यातील गोद्री येथे अखिल भारतीय हिंदू गोर बंजारा व लबाना नायकडा समाजाच्या महाकुंभाची बुधवारपासून सुरुवात झाली. यावेळी धर्मसभेत मार्गदर्शन करताना ते बोलत होते. व्यासपीठावर पोहरागडदेवी संस्थानचे गादीपती बाबूसिंगजी महाराज, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या धर्मजागरण समितीचे प्रमुख शरद ढोले, संत गोपाल चैतन्य महाराज, तेलंगणा येथून आलेले सुरेश महाराज, वृंदावनचे गुरू शरणानंद महाराज व गोपाल चैतन्य महाराज आदी संत उपस्थित होते. यावेळी अखिल भारतीय धर्मजागरण समितीचे प्रमुख शरदव ढोले यांनी बंजारा समाजाचे धर्मांतरण होऊ नये यासाठी तसेच धर्मांतरण थांबविण्यासाठी शेकडो संत येथे आले असल्याचे सांगितले. संत गोपाळ चैतन्य महाराज यांनी संत समाज धर्मरक्षणाचे काम करतो. तीन हजार गावांत धर्मपरिवर्तन झाले आहे, म्हणून कुंभाची गरज पडली आहे. हिंदू समाजात जागृती होण्यासाठी आणि धर्मरक्षणासाठी हा कुंभ आहे, असे सांगितले.



### हिंदू समाजात जागृती

**» अखिल भारतीय धर्मजागरण समितीचे प्रमुख शरदव ढोले यांनी बंजारा समाजाचे धर्मांतरण होऊ नये यासाठी तसेच धर्मांतरण थांबविण्यासाठी शेकडो संत येथे आले असल्याचे सांगितले. संत गोपाळ चैतन्य महाराज यांनी संत समाज धर्मरक्षणाचे काम करतो. तीन हजार गावांत धर्मपरिवर्तन झाले आहे, म्हणून कुंभाची गरज पडली आहे. हिंदू समाजात जागृती होण्यासाठी आणि धर्मरक्षणासाठी हा कुंभ आहे, असे सांगितले. संत बाबूसिंग महाराज यांनी समाज संघटित होण्यासाठी हा कुंभ आहे. भक्तिमार्गातून दिशा मिळते. समाजाला जागृत करण्यासाठी संत व्यासपीठावर उपस्थित झाले आहेत. बंजारा समाजाचा प्रथम कुंभ गोद्री येथे होत असून, हा ऐतिहासिक व अविस्मरणीय क्षण असल्याचे सांगितले.**

# बँक ऑफ महाराष्ट्रचा शुक्रवारी देशव्यापी संप

## बँकेतील कर्मचारी-अधिकारी संघटनांनी ही संपाची हाक

। मुंबई । महाईन्यूज ।

डेप्युटी चीफ लेबर कमिशनर यांनी तडजोडीसाठी बोलावलेली बैठक निष्फळ ठरल्याने बँक ऑफ महाराष्ट्र चा देशव्यापी संप येत्या शुक्रवारी (ता. २७) होईल. मुख्यतः बँकेची नोकरभरती अनेक वर्षे झाली नसल्याच्या प्रश्नावर बँकेतील कर्मचारी आणि अधिकारी संघटनांनी ही संपाची हाक दिली आहे.

त्यांच्या युनायटेड फोरम ऑफ महाबँक युनियन तर्फे हा संप पुकारण्यात आला आहे. गेल्या दहा वर्षात बँकेचा व्यवसाय अडीच पटीने वाढला, ४५० नवीन शाखा उघडल्या. पण कर्मचाऱ्यांची संख्या २० टक्के कमी झाली. मृत्यू, निवृत्ती, राजीनामे यामुळे रिकाम्या झालेल्या जागादेखील भरल्या नाहीत.

अशा स्थितीत कर्मचाऱ्यांना जास्त वेळ काम करावे लागते, सुट्टीच्या दिवशी कामावर यावे लागते, रजा घेता येत नाहीत. त्यामुळे कर्मचाऱ्यांना कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडणे अशक्य झाले असून या सगळ्याचा परिणाम त्यांच्या तब्येतीवर होत असल्याचा दावा संघटनेच्या पत्रकात करण्यात आला आहे.

तर अपुऱ्या कर्मचारी संख्येमुळे ग्राहक सेवा देता येत नसल्यामुळे बँकेच्या व्यवसायावर देखील वाईट परिणाम होत आहे. तक्रारी वारंवार मांडूनही बँक व्यवस्थापनाने प्रतिसाद न दिल्यामुळे संपाची हाक देण्यात आली आहे. संपाच्या दिवशी बँकेतील कर्मचारी व अधिकारी वर्गाने शाखेसमोर निदर्शने करावीत असे आवाहन युनायटेड फोरम ऑफ महाबँक युनियनच्या वतीने निमंत्रक विराज टिकेकर आणि सह निमंत्रक धनंजय कुलकर्णी यांनी केले आहे.

# देवेन भारतींसह महाराष्ट्रातील चौघांना ‘राष्ट्रपती पोलीस पदक’ जाहीर!

## महाराष्ट्रातील एकूण 74 पोलिसांना पुरस्कार जाहीर झाला; याशिवाय राज्यातील 31 पोलिसांची पोलीस शौर्यपदक

। नवी दिल्ली । महाईन्यूज ।

**प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला राष्ट्रपती पोलीस पदकांची घोषणा झाली आहे. यात महाराष्ट्रातील एकूण 74 पोलिसांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे. यात मुंबईचे विशेष पोलीस आयुक्त देवेन भारती यांच्यासह चार पोलीस अधिकाऱ्यांनाही राष्ट्रपती पोलीस पदक जाहीर झालं आहे. याशिवाय राज्यातील 31 पोलिसांची पोलीस शौर्यपदक तर 39 पोलीस अधिकारी यांची पोलीस पदकासाठी निवड झाली आहे. प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येस केंद्रीय गृहमंत्रालयाकडून पोलीस पदकांची घोषणा करण्यात आली.**

राज्यातील चार पोलिस अधिकाऱ्यांना विशेष सेवेसाठी राष्ट्रपती पदकाने सन्मानित केलं जाणार आहे.



राष्ट्रपती पद जाहीर झालेल्या पोलीस अधिकाऱ्यांमध्ये मुंबईचे विशेष पोलीस आयुक्त देवेन भारती, महाराष्टाचे अतिरिक्त पोलीस महासंचालक अनुप कुमार सिंह, मुंबईतील पोलीस उपनिरीक्षक (वरिष्ठ गुप्तचर अधिकारी, राज्य गुप्तचर विभाग, मुंबई) संभाजी देशमुख आणि ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षक दीपक जाधव यांचा समावेश आहे. यासह नाशिक पोलीस आयुक्तालयाच्या मध्यवर्ती गुन्हेशाखेचे सहायक पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय कडनोर आणि परिक्षेत्रातील सुखदेव मुरकुटे यांना गुणवंत पोलीस पदक जाहीर झालं आहे. राज्यातील 31 पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना राष्ट्रपती शौर्य पदाकाने सन्मानित केलं जाणार आहे.प्रजासत्ताक दिनानिमित्त विविध राज्यातील एकूण 901 पोलिसांना पोलीस पदक जाहीर झालं आहे. यातील 104 पोलीस कर्मचाऱ्यांना शौर्य पोलीस पदाने गौरवण्यात येईल, तर 93 पोलीस कर्मचाऱ्यांना विशेष सेवेसाठी राष्ट्रपती पोलीस पदक तर 668 पोलीस कर्मचाऱ्यांना गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पोलीस पदकाने सन्मानित केलं जाईल. पोलीस शौर्य पुरस्कार जाहीर झालेल्या 140 कर्मचाऱ्यांपैकी सर्वाधिक म्हणजे 80 पोलीस कर्मचारी हे प्रभाविक अतिरेकी क्षेत्रात कार्यरत आहेत. शौर्य पदक मिळवण्यात सीआरपीएफ अव्वल क्रमांकावर असून त्यांना 47 पदकं मिळाली आहेत. यात महाराष्ट्राला 31, जम्मू काश्मीर 25, झारखंड 9, दिल्ली, छत्तीसगड, बीएसएफच्या प्रत्येकी 7 जवान आणि उर्वरित इतर राज्य, केंद्रशासित प्रदेश आणि सीएपीएफ जवानांना हा पुरस्कार मिळाला आहे.

यासह 55 जवानांना होमगार्ड व सिविल डिफेंस मेडलने सन्मानित केलं जाणार आहे. हे शौर्य पदक राष्ट्र सुरक्षा आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी जवानांनी दाखवलेल्या शौर्यासाठी दिलं जात,. उत्कृष्ट सेवा आणि नागरी संरक्षणासाठी राष्ट्रपतींच्या हस्ते विशिष्ट सेवा आणि नागीर संरक्षण पदक प्रदान केले जाते. 9 जवानांना हे पदक गुणवत्तापूर्ण सेवेसाठी आणि 45 जवानांना नागरी संरक्षणासाठी दिले जाणार आहे.

### पुरस्कार जाहीर

**»पोलीस शौर्य पुरस्कार जाहीर झालेल्या 140 कर्मचाऱ्यांपैकी सर्वाधिक म्हणजे 80 पोलीस कर्मचारी हे प्रभाविक अतिरेकी क्षेत्रात कार्यरत आहेत. शौर्य पदक मिळवण्यात सीआरपीएफ अव्वल क्रमांकावर असून त्यांना 47 पदकं मिळाली आहेत. यात महाराष्ट्राला 31, जम्मू काश्मीर 25, झारखंड 9, दिल्ली, छत्तीसगड, बीएसएफच्या प्रत्येकी 7 जवान आणि उर्वरित इतर राज्य, केंद्रशासित प्रदेश आणि सीएपीएफ जवानांना हा पुरस्कार मिळाला आहे.**

---

# “फडणवीसांच्या अटकेचा कट शरद पवारांनी रचला”

## गुणरत्न सदावर्तेंचा खळबळजनक दावा

।नेपाळ।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

महाविकास आघाडी सरकारच्या काळात मला तुरुंगात टाकण्याचा डाव होता, असा गंभीर आरोप राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एबीपी माझाच्या कार्यक्रमात केला होता. दरम्यान, यासंदर्भात वकील गुणरत्न सदावर्ते यांनी खळबळजनक दावा केला आहे. फडणवीसांच्या अटकेचा कट शरद पवार यांनी रचना असल्याचे ते म्हणाले. मुंबई माध्यमांशी बोलताना त्यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया दिली. नेमकं काय म्हणाले गुणरत्न सदावर्ते? “दिलीप वळसे पाटील यांच्या तोंडून काल ‘कट’ असा एक शब्द निघाला.




# ‘भाजपाने फक्त कचऱ्याचे ढिगारे दिले, पराभव मान्य करा

## दिल्ली महापौर निवडणुकीवरून मनिष सिसोदियांची भाजपावर टीका

।नवी दिल्ली ।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**दिल्ली महापालिकेच्या निवडणुकीत आम आदमी पार्टीने एकहाती सत्ता मिळवली आहे. मात्र सभागृहातील गदारोळ आणि भाजपा-आप पक्षाच्या नगरसेवकांमधील वाद यामुळे अद्याप दिल्लीला महापौर तसेच उपमहापौर मिळू शकलेले नाहीत. मंगळवारीदेखील फक्त नगरैवकांचाच शपथविधी सोहळा पार पडला.**

याच कारणामुळे दिल्लीचे उपमुख्यमंत्री मनिष सिसोदिया यांनी भाजपाने आपला पराभव



स्वीकारावा आणि महापौरपदाच्या निवडणुकीसाठी सहाय्य करावे, असे आवाहन केले आहे. सभागृहात ‘मोदी-मोदी’ अशा घोषणा दिल्या. सभागृहात काही नगरसेवकांनी गदारोळ केल्यामुळे मंगळवारीदेखील दिल्लीच्या महापौर आणि उपमहापौरपदाची निवडणूक होऊ शकली नाही. सभागृहातील वरीष्ठ सदस्य तसेच निवडून आलेल्या नगरसेवकांच्या शपथविधीनंतर सभागृह १५ मिनिटांसाठी तहकूब करण्यात आले होते. यावेळी भाजपाच्या काही नगरसेवकांनी सभागृहात ‘मोदी-मोदी’ अशा घोषणा दिल्या. तसेच आप पक्षाचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांच्याविरोधात घोषणा दिल्या. “प्रथम त्यांनी दिल्ली महापालिकेची निवडणूक टाळण्याचा प्रयत्न केला. या निवडणुकीत पराभव झाल्यानंतर आता भाजपा महापौरपदाच्या निवडणुकीपासून पाळ काढत आहे. भाजपाने त्यांचा पराभव स्वीकारला पाहिजे. तसेच महापौरपदाच्या निवडीसाठी त्यांनी सहकार्य केले पाहिजे,” असे आवाहनही मनिष सिसोदिया यांनी केले.

दरम्यान, आम्ही जे करू शकलो नाही, ते आप पक्षाचे महापौर करू शकतात; याची भाजपाला कल्पना आहे, अशी खोचक टीकादेखील सिसोदिया यांनी केली.

### भाजपा महापौरपदाच्या निवडणुकीपासून दूर

**»या सर्व गदारोळानंतर मनिष सिसोदिया यांनी आक्रमक पवित्रा धारण केला आहे. “भाजपा महापौरपदाच्या निवडणुकीपासून दूर पळत आहे. भाजपाचे नाटक प्रत्येकजण पाहतो आहे. लोक त्यांच्या राजवटीला कंटाळले होते. भाजपाने दिल्लीला फक्त कचऱ्याचे ढिगारे दिले. त्यांनी संपूर्ण राजधानी उद्ध्वस्त करून टाकली आहे,” अशी टीका मनिष सिसोदिया यांनी केली.**

# "...घरी येऊन घाल मला लग्नाची मागणी",

'महाराष्ट्राची हास्यजत्रा' हा छोट्या पडद्यावरील लोकप्रिय शो आहे. या कार्यक्रमातील हास्यवीर प्रेक्षकांना खळखळवून हसवतात. अनेक विनोदवीरांना हास्यजत्रेमुळे प्रसिद्धी मिळाली. अभिनेत्री शिवाली परबही याच कार्यक्रमातून घराघरात पोहोचली.

हास्यजत्रेमुळे शिवालीच्या चाहत्या वर्गात दिवसेंदिवस भर पडत आहे. शिवाली सोशल मीडियावर प्रचंड सक्रिय असून ती चाहत्यांच्या संपर्कात राहण्याचा प्रयत्न करते. नवीन प्रोजेक्टबद्दल शिवाली तिच्या चाहत्यांना माहिती देत असते. तसंच अनेकदा ती फोटो व व्हिडीओही शेअर करताना दिसते. शिवालीचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर सध्या व्हायरल होत आहे.शिवाली एक उत्तम अभिनेत्री आहे. हास्यजत्रेतून प्रसिद्धी मिळवलेल्या शिवालीने चित्रपटांतही काम केलं आहे. 'प्रेम प्रथा धुमशान' या चित्रपटात ती मुख्य भूमिकेत दिसली होती. या चित्रपटातील तिने दिलेल्या किसींग सीनचीही चर्चा रंगली होती.





# मुंबईत भाड्याने घर न मिळाल्याने उर्फीची खंत

**मॉडेल उर्फी जावेद सतत तिच्या अतरंगी कपड्यांमुळे चर्चेत असते. यावरुन अनेकजण तिला ट्रोल देखील करत असतात. मागील काही दिवसांपासून उर्फी आणि चित्रा वाघ यांच्यात रंगलेल्या सोशल मीडियावरील वादानंतर आता उर्फी पुन्हा एकदा आणखी एका कारणामुळे चर्चेत आली आहे. आता उर्फी सध्या मुंबईमध्ये भाड्याने घर शोधत आहे पण तिला मुंबईमध्ये राहण्यासाठी भाड्याने घर मिळत नाही. ती मुस्लिम असल्यामुळे आणि तिच्या कपड्यांमुळे तिला कोणीही घर भाड्याने द्यायला तयार नाही. असं तिने सांगितलं.**

उर्फीने ट्वीट शेअर करत लिहिलं की, "मी ज्या प्रकारचे कपडे घातले त्यामुळे मुस्लिम घराचे मालक मला भाड्याने घर द्यायला तयार नाही तर हिंदू मालक मी मुस्लिम असल्यामुळे तिला भाड्याने घर द्यायला तयार नाहीत. तर राजकारण्यांकडून मला मिळत असेल्या धमक्यांमुळे काही घर मालकांना मला भाड्याने घर द्यायचे नाही. मुंबईमध्ये भाड्याने घर शोधणं खूप कठीण झालं आहे."

भाजपा नेता चित्रा वाघ यांनी केली होती तक्रार

नुकत्याच काही दिवसांपूर्वी उर्फी मुंबई पोलिसांनी समन्स पाठवला होता. उर्फी विरोधात भाजपा नेता चित्रा वाघ यांनी तक्रार दाखल केली होती. उर्फी सार्वजनिक ठिकाणी अश्लीलता पसरवत असल्याचा आरोप तिच्यावर करण्यात आला होता.



# 'पठाण' ठरला बॉक्स ऑफिसचा बादशाह

'शाहरुख खानचा 'पठाण' चित्रपट आज प्रदर्शित झाला आहे. २०२३ मधील हा पहिला बिग बजेट आणि तगडी स्टारकास्ट असलेला चित्रपट आहे. 'बेशरम रंग' गाण्यामुळे झालेल्या वादानंतर चित्रपटावर बॉयकॉट ट्रेंडचं सावट होतं. त्यामुळे चित्रपटाला प्रेक्षकांचा कसा प्रतिसाद मिळेल, याबद्दल उत्सुकता होती. पण, शाहरुखच्या चित्रपटाने पहिल्याच दिवशी प्रेक्षकांची मनं जिंकली असून चाहते 'पठाण'ला पाहण्यासाठी गर्दी करत आहेत.

काही ठिकाणी चित्रपटाचे शो कॅन्सल झाले असले तरी बहुतांश ठिकाणी चित्रपटाचं जबरदस्त ओपनिंग झालं, पहाटे ६ वाजल्यापासून चाहत्यांनी चित्रपटगृहाबाहेर गर्दी केली. 'पठाण'ने अडवांस बुकिंगमध्येच बरेच रेकॉर्ड तोडल्याचं वृत्त समोर आलं होतं, आता हा चित्रपट प्रदर्शित झाल्यावर याची पहिल्या दिवसाची कमाई किती असेल याबद्दल चर्चा सुरू आहे.रोहित जयसवाल आणि सुमित कडेल या दोन्ही चित्रपट विश्लेषक आणि तज्ज्ञांनी त्यांच्या ट्वीटमधून 'पठाण'च्या पहिल्या दिवसाच्या कमाईचा अंदाज बांधला आहे. त्यांच्या माहितीनुसार शाहरुख आणि दीपिकाचा 'पठाण' पहिल्याच दिवशी ५० कोटीहून अधिक कमाई करणार आहे. गेल्या वर्षभरात हिंदी चित्रपटांना लागलेलं ग्रहण पाहता यावेळी हिंदी चित्रपट जबरदस्त कमाई करतील हे 'पठाण'ने सिद्ध केलं आहे.


२०२३ हे वर्ष शाहरुखसाठी चांगलंच लाभदायक ठरणार आहे.



# क्वीन इज बॅक! कंगना रणौतला परत मिळालं तिचं ट्विटर अकाउंट,

अभिनेत्री कंगना रणौत ही नेहमीच तिची बेधडक वृत्ती आणि स्पष्टवक्तेपणामुळे चर्चेत असते. समाजातील तिला न आवडणाऱ्या, न पटणाऱ्या गोष्टींबद्दल ती बिनधास्तपणे सोशल मीडियावरून तिची मतं मांडत असते. तिच्या याच स्पष्टवक्तेपणामुळे मध्यंतरी तिचं ट्विटर अकाउंट सस्पेंड करण्यात आलं होतं. मात्र आता तिला ते परत मिळालं आहे.

कंगना रणौतला नुकतंच तिचं ट्विटर अकाउंट परत मिळालं. तिचं जुनंच अकाउंट आता रिस्टोर करण्यात आलं आहे. त्यामुळे मोठ्या गॅपनंतर ती ट्विटरवर परतली आहे. हे अकाउंट परत मिळाल्या मिळाल्या लगेच तिने एक ट्वीट करत त्याबद्दल आनंद व्यक्त केला आहे.या अकाउंटवरून कंगनाने एक ट्वीट केलं. तिने लिहिलं, "सर्वांना नमस्कार, इथे परत आल्याचा मला आनंद झाला." हे ट्वीट कंगनाच्या टीमच्या वतीने करण्यात आलं आहे. आता या ट्वीटर कमेंट्स करत तिच्या चाहत्यांप्रमाणेच अनेक सेलिब्रिटींनी देखील तिचं स्वागत केलं आहे.





काही वर्षांपासून ती या माध्यमावर फार सक्रिय होती. पण मे २०२१ मध्ये कंगना रणौतचे ट्विटर अकाउंट सस्पेंड करण्यात आलं होतं. ट्विटर कंपनीच्या कायद्याचे उल्लंघन केल्याने तिच्यावर ही कारवाई झाली होती. ट्विटरद्वारे ती वेगवेगळ्या विषयांवर सतत व्यक्त व्हायची. कंपनीद्वारे अकाऊंटवर निर्बंध आल्यामुळे तिने अन्य सोशल मीडिया साईट्सचा आधार घेतला. तर आता पुन्हा एकदा ती ट्विटरवर परतली आहे.



# जिंकलंस भावा!

## ICC ने सूर्याच्या शिरपेचात खोवला मानाचा तुरा

**।नवी दिल्ली। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

आयसीसीने भारताचा 360 डिग्री फलंदाज सूर्यकुमार यादवच्या शिरपेचात अजून एक मानाचा तुरा खोवला आहे. आयसीसीने त्याला वर्ष 2022 चा टी 20 क्रिकेटर ऑफ द इयर घोषित केलं आहे. तसंही ही घोषणा काही आश्चर्यकार घोषणा नाही. कारण सूर्यकुमार यादवने 2022 वर्षात टी 20 क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा केल्या. तो आंतरराष्ट्रीय टी 20 मध्ये एका वर्षात 1000 पेक्षा जास्त धावा करणारा जगातील दुसरा क्रिकेटर बनला होता.

सूर्यकुमार यादवने 2022 हे वर्ष गाजवले. त्याने आंतरराष्ट्रीय टी 20 क्रिकेटमध्ये 187.43 च्या जबरदस्त सरासरीने 1164 धावा केल्या. सरत्या वर्षात सूर्यकुमार यादव टी 20 आंतरराष्ट्रीयमध्ये सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला.

सूर्यकुमार यादवने गेल्या वर्षी षटकारांचा देखील पाऊस पाडला होता. त्याने 68 षटकार मारले. एका वर्षात टी 20 क्रिकेटमध्ये सर्वाधिक षटकार मारण्याचा विक्रम त्याने आपल्या नावावर केला.

### टी 20 मध्ये वर्षात दोन शतके

**»सूर्यकुमार यादवने गेल्या वर्षी टी 20 क्रिकेटमध्ये दोन शतके ठोकण्याचा भीम पराक्रम केला होता. त्याने पहिले शतक हे इंग्लंडविरूद्ध ठोकले तर दुसरे न्यूझीलंडविरूद्ध ठोकले. सूर्यकुमार यादवने गेल्या वर्षी टी 20 क्रिकेटमध्ये दोन शतकांबरोबरच 9 अर्धशतके देखील ठोकली आहेत.**

# वर्ल्ड कप २०२३ साठी टीम इंडिया फेव्हरेट!

## मायकेल वॉर्नने इंग्लंडसहित सर्व संघाला दिला इशारा

**।भुवनेश्वर। महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

टीम इंडियावर अनेकदा टीका करणाऱ्या मायकेल वॉनला भारताचा कर्णधार रोहित शर्मा आणि शुबमन गिल यांच्या वेगवान फलंदाजीची खात्री पटली आहे. टीम इंडिया वर्ल्डकपचा हॉट फेव्हरिट संघ बनला आहे, असं तो म्हणाला.



इंदोरच्या होळकर क्रिकेट स्टेडिअमवर मंगळवारी (दि. २४ जानेवारी) भारत विरुद्ध न्यूझीलंड संघातील तिसरा आणि अखेरचा एकदिवसीय सामना दिमाखात पार पडला. या सामन्यात न्यूझीलंडकडे व्हाईट वॉश टाळण्याची संधी होती, परंतु त्यांना संधीचं सोनं करण्यात अपयश आले. त्यामुळे हा सामना भारतीय संघाने ९० धावांनी जिंकला. त्याचसोबत मालिकेवर ३-०ने आपले नाव कोरले. या विजयानंतर रोहित शर्मा याने मोठे भाष्य केले आहे. तसेच, त्याने भारतीय गोलंदाजांचे कौतुकही केले आहे.

इंग्लंडचा माजी कर्णधार मायकेल वॉनला भारतीय संघावर टीका करताना तुम्ही पाहिले असेलच. पण, यावेळी मायकल वॉनलाही भारतीय संघातील खेळाडूंचे कौतुक करण्यापासून रोखता आले नाही. कर्णधार रोहित शर्मा आणि शुबमन गिलच्या शानदार फलंदाजीने मायकल वॉनचे मन जिंकले आहे.

मायकेल वॉनने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे, ज्यामध्ये त्याने रोहित आणि गिलच्या फलंदाजीच्या शैलीचे कौतुक केले आहे. टीम इंडियाच्या फलंदाजीची थोडीशी झलक पाहून मायकेलने आगामी एकदिवसीय विश्वचषक २०२३ चा विजेता म्हणून त्याला रेड हॉट फेव्हरिट म्हटले आहे. रोहित शर्मा आणि शुबमन गिलची खेळी पाहून वॉनने हे सांगितले आहे.

"अखेरीस भारताने एकदिवसीय क्रिकेट आक्रमकपणे खेळण्याचा निर्धार केला आहे ज्यामुळे त्यांना यावर्षीचा पुरुष विश्वचषक जिंकण्यासाठी मजबूत फेव्हरिट बनले आहे," वॉनने आपल्या ट्विटमध्ये म्हटले आहे. यानंतर त्याचे ट्विट सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरले.

### इंग्लंडचे मायकेल वॉनचे मिलेकल वॉन

**» मायकेल वॉन यांनी सांगितले की न्यूझीलंडविरुद्ध भारत अशाच प्रकारे खेळत आहे. पहिल्या एकदिवसीय सामन्यात, संघाने शुबमन गिलच्या दुहेरी शतकातील ३४९ धावा केल्या, तर दुसऱ्या एकदिवसीय सामन्यात न्यूझीलंडचा संघ सर्व १०८ धावांवर होता. त्याच वेळी, भारतीय संघाने ९ विकेटमध्ये आपले लक्ष्य सहजपणे पूर्ण केले. पण आता तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात कीवी संघाने भारताला प्रथम फलंदाजीची संधी दिली, त्यानंतर सुरुवातीपासूनच भारतीय खेळाडूंनी न्यूझीलंडला हादरवून टाकले. मायकेल वॉन यांनी या ट्विटमध्ये लिहिले की 'शेवटी भारताने आक्रमकपणे खेळण्याचा निर्णय घेतला आहे. यावर्षी पुरुषांच्या विश्वचषकात ही शैली त्याला एक लाल गरम आवडता बनवते.**